# प्रेस नोट

**आलोसे श्री. संदेश नैनदास बोरकर वय ३९ वर्ष पद- सहाय्यक महसुल अधिकारी-प्रस्तुतकार १ तहसिल कार्यालय देवरी ता. देवरी जि. गोंदिया (वर्ग-३) सध्या रा.कैलाश नागरीकर, यांचे घरी किरायाने पंचशिल चौक विठठल रुखमाई मंदिरच्या मागे, देवरी ता.देवरी जि.गोंदिया मुळ पत्ता- रा. ठाणा पोष्ट. ठाणा ता.आमगांव जि.गोंदिया यांनी लाच रक्कम १,५००/-रु. मागणी करुन, स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडुन कार्यवाही केलेबाबत.**

यातील तक्रारदार राहत असलेल्या देवरी येथील सर्वे नंबर ३०९/१/ब मधील सोसायटी मध्ये ओपन स्पेस असून, सदर ओपन स्पेसवर सार्वजनिक गणेश व साई बहुउददेशिय संस्था देवरी यांनी अवैध बांधकाम केले असुन सदर बांधकामावर कारवाई करुन काढण्यासाठी तक्रारदार व ईतर लोकांनी नगरपंचायत देवरी, मंडळ अधिकारी यांना पत्रव्यवहार करुन सुध्दा कायदेशिर कारवाई न झाल्यामुळे तक्रारदार व ईतर लोकांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे रिट पिटीशन दाखल केले होते. सदर रिट पिटीशन मध्ये मा. न्यायालयाने योग्य कार्यवाही करणेबाबत मुख्य अधिकारी नगर पंचायत देवरी यांना आदेश दिले होते. सदर आदेशाचे अनुषंगाने तक्रारदार यांनी उपविभागीय देवरी यांना पत्र लिहुन मा. न्यायालयाच्या आदेशान्वये कारवाई करणेबाबत पत्र दिले असता, उपविभागीय अधिकारी देवरी यांनी तहसिलदार देवरी यांना सदर प्रकरणात सविस्तर चौकशी/ तपासणी करुन आवेदकास परस्पर कळविण्याबाबत व वस्तुनिष्ठ अनुपालन अहवाल सादर करण्याबाबत दिनांक १८/१२/२०२५ रोजी कळविले होते. दिनांक १२/०२/२०२६ रोजी तक्रारदार हे तहसिल कार्यालय देवरी येथे सादर अर्ज बाबत चौकशी करण्यासाठी गेले असता तेथील लिपीक श्री बोरकर यांना भेटुन अर्ज चौकशी अहवाल तयार झाला किंवा नाही याबाबत विचारणा केली असता, तुमच्या बाजुने अहवाल तयार करुन देण्यासाठी २,०००/-रु. द्यावे लागतील असे तक्रारदार यांना सांगितले तसेच दिनांक १३/०२/२०२६ रोजी आलासे श्री बोरकर यांनी तक्रारदार यांना फोन करुन बोलावुन सायंकाळी २,००० /-रु. घेऊन या असे सांगितले. तक्रारदार यांना ती लाच रक्कम देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १३.०२.२०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया येथे येऊन आलोसे विरुध्द तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन दिनांक १३.०२.२०२६ रोजी सापळा अधिकारी यांनी दोन पंचासह देवरी येथे जाऊन तक्रारदार यांना पंचासह तहसिल कार्यालय देवरी येथे आलोसे यांचेकडे पाठवुन लाच मागणी पडताळणी कारवाई केली असता, आलोसे यांनी तक्रारदार यांच्या बाजुने अहवाल तयार करुन पाठविण्यासाठी तडजोडअंती १,५०० /-रु. लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली.

दिनांक १३.०२.२०२६ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान श्री. संदेश नैनदास बोरकर वय ३९ वर्ष पद- सहाय्यक महसुल अधिकारी- प्रस्तुतकार १ तहसिल कार्यालय देवरी ता. देवरी जि. गोंदिया (वर्ग-३) यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करुन तक्रारदार यांच्या बाजुने चौकशी अहवाल तयार करुन पाठविण्यासाठी तक्रारदार यांच्याकडुन १,५००/-रु. लाच रक्कम स्विकारुन गैरफायदा घेतल्याने त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन देवरी जि. गोंदिया गु. र. क्र. ८५/२०२६ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनीयम १९८८ (संशोधन अधिनियम-२०१८) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून, आरोपी यास दि. १४/०२/२०२६ चे ०८.०६ वा.अटक करण्यात आले आहे.

ा, आरोपी
अनुक्रमणिकेनुसार तपा

सदरची कामगिरी मा.श्री. डॉ. दिगंबर प्रधान पोलीस अधीक्षक ला.प्र.वि. नागपुर, मा.श्रीमती माधुरी बाविस्कर मॅडम, अपर पोलीस अधिक्षक ला.प्र.वि. नागपुर, मा.श्री. विजय माहुलकर अपर पोलीस अधिक्षक ला.प्र.वि. नागपुर यांचे मार्गदर्शनात पो.नि.उमाकांत उगले, पो.नि.अरविंद राऊत, स.फौ. चंद्रकांत करपे, पो.हवा. संजय बोहरे, पो.हवा मंगेश कहालकर, ना.पो.शि. संतोष शेंडे, अशोक कापसे, संतोष बोपचे, प्रशांत सोनवाने, मनापोशि. संगिता पटले, रोहीणी डांगे, चालक पोहवा. सोमेश इंदुरकर सर्व लाप्रवि.गोंदिया यांनी केली.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, त्यांची लोकसेवका विरुध्द तक्रार असल्यास त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया येथे खालील माध्यमाद्वारे संपर्क करावा. त्यांच्या तक्रारीची योग्य ती दखल घेण्यात येईल.

Toll Free No :-1064
Landline No :- 07182/251203
Whatsapp No:- 9664959090
Email Id :- acbgondia@gmail.com

(उमाकांत उगले)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया